सेवार्थ प्रणालीतील अधिकारी/कर्मचारी यांचे
ई-केवायसी पूर्ण करणेबाबत ...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४**
दालन क्रमांक ३३९, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २७ मार्च, २०२६

**प्रस्तावना -**

सेवार्थ प्रणालीमध्ये सर्व नियमित शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची माहिती भरण्यात आलेली आहे. सदर माहितीनुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन आहरीत होत असते. सदर माहितीमध्ये त्यांच्या बँक खात्याच्या माहितीसोबतच संबंधित कर्मचाऱ्यांचा PAN क्रमांक, आधार क्रमांक नोंदविलेला आहे. एकंदरीतच पूर्ण माहितीमध्ये कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांची दुबार माहिती सेवार्थ प्रणालीत नोंद होऊ नये तसेच कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यास दुबार वेतन अदा होऊ नये, याकरीता शासनाने ठोस उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन, सर्व प्रशासकीय विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

१. सेवार्थ प्रणालीत वेतन घेणाऱ्या सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहे एप्रिल, २०२६ देय मे, २०२६ या वेतन देयकाअगोदर ई-केवायसी पूर्ण करावयाची आहे. **सदर ई-केवायसी पूर्ण न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे माहे एप्रिल, २०२६ देय माहे मे, २०२६ चे वेतन आहरीत करण्यात येणार नाही.**

२. सदर ई-केवायसी पूर्ण करण्यापूर्वी अधिकारी/कर्मचारी यांच्या बॅक खात्याशी आधार क्रमांक संलग्न असलेले बँक खाते सेवार्थ प्रणालीत अद्ययावत केले असले पाहिजे. सेवार्थ प्रणालीत उपलब्ध असलेले बँक खाते आधार क्रमांकांशी संलग्न नसेल तर असे खाते त्वरीत बदलण्यात येऊन सेवार्थ प्रणालीत आधार क्रमांकांशी संलग्न असलेले बँक खाते अद्ययावत करण्यात यावे.

३. तसेच सेवार्थ प्रणालीत नोंदविलेला PAN क्रमांक चूकीचा असल्यास, नोंदविण्यात आलेला PAN क्रमांकाची दुरुस्ती करुन अद्ययावत करण्यात यावा.

४. सदर ई-केवायसी प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांनी व्यक्तिशः पूर्ण करुन त्याचे प्रमाणपत्र आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे जमा करावयाचे आहे. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी असे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सेवार्थ प्रणालीत देण्यात आलेल्या ई-केवायसी अपडेशन रिपोर्टमध्ये सदर अधिकारी/ कर्मचारी यांची नोंद करावयाची आहे. सदर नोंद करतांना ई-केवायसी अन्वये पडताळणी करण्यात आलेला बॅक खात्याचा तपशील व सेवार्थ प्रणालीत नोंदविण्यात आलेला बँक तपशील या दोहोंमध्ये साम्य असल्यासच सदर नोंद घेण्यात यावी अन्यथा प्रथम ई-केवायसी केल्याप्रमाणे सेवार्थ प्रणालीत बँक खात्याचा तपशील अद्ययावत करावा.

२. तसेच सदरचे परिपत्रक हे सर्व जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, शालेय शिक्षण विभाग (शालार्थ प्रणाली), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्लित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये, कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्लित मान्यता प्राप्त व अनुदानित महाविद्यालये/ संस्था, अदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या मान्यताप्राप्त व अनुदानित आश्रमशाळा व संस्था, वैद्यकीय विद्यापीठ उच्च व तंत्र शिक्षण/कौशल्य विकास विभागाच्या अधिनस्त संस्था, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील संस्था यांनादेखील लागू राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०३२७१४४१५६७००५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ASHOK GULAB CHAUDHARI

Digitally signed by ASHOK GULAB CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=3A31F1E61A49658347833C8C22A09CB8141A51CF08DA760FD5E2A1B3C1769153, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3E9FA04602558FF79EC2FCB3553E7DA28D75751FAA9AA5AA2261D3E69F011558, cn=ASHOK GULAB CHAUDHARI
Date: 2026.03.27 14:43:27 +05'30'

**( अशोक चौधरी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

**१. सर्व आहरण व संवितरण अधिकारी (सेवार्थ) / सर्व आहरण व संवितरण अधिकारी (कस्टमाईज्ड सेवार्थ)**
**२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग**
**३. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.**
**४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.**
**५. सर्व उप कोषागार अधिकारी.**

*** प्रत कार्यवाहीस्तव-**

**मे. महाआयटी, तिसरा मजला, अेपीजे हाऊस, चर्चगेट, मुंबई-**४०००२०

यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कस्टमाईज्ड सेवार्थ प्रणालीतील वापरकर्त्यांकरीता उपरोक्तप्रमाणे केवायसी केल्यानंतर प्रणालीमध्ये केवायसी नोंद करण्यासाठी सुविधा निर्माण करुन देण्याची कार्यवाही करावी.

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव / प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव.
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख
८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई

१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१४. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजी नगर/ अमरावती/ नागपूर
२८. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर/ अमरावती/ नागपूर
२९. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३०. निवड नस्ती/कोषा प्रशा-४